# नियमित दिवाणी दावा २७/२०१५ निशाणी ७० वर आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता चे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. आपल्या अर्जातुन वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. सदर प्रकरणी वादींनी नि.नं.५ चा अर्ज दिला होता. तो मे. कोर्टानी नामंजूर केला आहे. सदरचे निर्णयावर नाराज होवून वादींनी पंढरपूर जिल्हा न्यायाधिश सो. यांचे कोर्टात दिवाणी किरकोळ अपिल नं.४७/२०१५ हे दाखल केले होते. ते निकाली झाले आहे.

सदरचे प्रकरण प्रलंबित असताना यातील प्रतिवादी यांनी वादीचे दावा मिळकतीतून तथाकथित चुकीचा व बेकायदेशीर असा कॅनॉल निर्माण केला. त्यामुळे सदरचा दावा प्रलंबित असताना सदरची घटना घडली आहे. त्यामुळे बदललेल्या परिस्थितिमध्ये सदर प्रकरणात में. कोर्टासमोर खरी वस्तुस्थिती येणेकरीता वादी त्यांचे दाव्यात अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरूस्ती होवून मिळणे गरजेचे आहे. तरी दावा दुरूस्तीचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती वादी करीत आहे.

३. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादीने विरोध दर्शविणारा खुलासा दाखल करून वादीने दिलेला दावा दुरूस्तीचा अर्ज बेकायदेशीर आहे अशी हरकत घेतलेली आहे. वादीने आपल्या अर्जातून प्रतिवादीने वादीचे क्षेत्राचे केलेले नुकसान रक्कम रु. १५,००,०००/- व त्या रकमेवर द.सा.द.शे.१२ टक्के व्याज याप्रमाणे वादीनी प्रतिवादीकडून नुकसान भरपाईपोटी देवविण्यात यावी" अशी मागणी केलेली आहे, सदर रकमेवर यातील वादी यांनी मे. कोर्टात योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिलेला नाही. त्यामुळे वादीचे दावा दुरुस्ती अर्जास सी.पी.सी.कलम ७ नियम ११ ची बाधा येत असून वादीचा दावा दुरूस्ती अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. प्रतिवादींनी पुढे अशी हरकत घेतली आहे

की, वादी याद्वारे जी नुकसान भरपाई संबंधी मागणी करीत आहे त्यांच्याशी संबंधीत कोणताही वाद या मे. कोर्टात चालू शकत नाही. त्यामुळे वादीचा दावा दुरूस्तीचा अर्ज हा फेटाळण्यास पात्र आहे. तरी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याच्या कामी दाखल केलेल्या कागदपत्राची पाहणी केली. प्रस्तुतचे अर्जाद्वारे वादीने दाव्यात नियोजीत दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी मागणी केली आहे. आपल्या अर्जातून वादीने अशी तक्रार केली आहे की दावा प्रलंबीत असताना प्रतिवादींनी दावा मिळकतीत नव्याने काही बांधकाम केलेले आहे. त्यामुळे नियोजीत दुरुस्तीद्वारे वादी दाव्यात नेमके काय समाविष्ट करू इच्छीतो हे पाहणे गरजेचे आहे. वादीचे कथनानुसार दावा प्रलंबीत असताना प्रतिवादींनी बेकायदेशीरपणे दावा मिळकतीमध्ये कॅनॉलचे काम चुकीचया पध्दतीने पूर्ण केले आहे . या कामामुळे वादीचे किती क्षेत्र वाया गेले हया बाबी वादी दावा दुरूस्त करुन दाव्यात समाविष्ट करु इच्छीतो. याशिवाय दावा मिळकत पुर्ववत करून मिळण्याबाबतची मागणी व अनुषंघीत दाद म्हणून नुकसान भरपाईची देखील मागणी वादी करु इच्छीतो.

५. वादीच्या अर्जाबाबत प्रतिवादींनी हशी हरकत घेतली आहे की, वादीने नियोजीत दुरूस्तीद्वारे नुकसान भरपाई मागीतलेली असून भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुनःस्थापना आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ चे कलम ६३ नुसार राज्य घटनेच्या कलम २२६ किंवा २२७ नुसार मा.उच्च न्यायालय अगर मा. सर्वोच्च न्यायालय वगळता त्या संबंधीचा वाद इतर कोणतेही दिवाणी न्यायालयात चालवू शकत नाही. भुसंपादना संबंधीचा कोणत्याही वादाचे निवारण जिल्हाधिकारी किंवा प्राधिकरणाला या अधिनियमाने अधिकार दिलेला आहे. त्यामुळे या संर्दभात दिवाणी न्यायालय कोणताही मनाई हुकुम देवू शकत नाही. त्यामुळे

वादीचा दावा चालविणेचा या मे.कोर्टास अधिकार नाही. त्यामुळे वादी यांनी दिलेला दावा दुरूस्तीचा अर्ज बेकायदेशीर असल्यामुळे तो नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

६. प्रतिवादीने वरीलप्रमाणे उपस्थित केलेल्या सर्व हरकती या, वादीचा दावा कायदयाप्रमाणे या न्यायालयात न टिकण्याजोगा आहे या कथनाच्या अनुशंगाने उपस्थित केलेल्या आहेत. प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज देवून वादीचा दावा कायदयाप्रमाणे न टिकण्याजोगा आहे त्यामुळे तो रद्द करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. त्यामुळे त्या अर्जाच्या चौकशीवेळी सदर हरकतींमध्ये तथ्य आहे किंवा कसे हे पडताळून पाहण्याची संधी या न्यायालयास आहे. वादींने आपल्या अर्जातून मागणी केलेली दुरूस्ती ही दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनांवर आधारीत आहे. त्यामुळे ते दुरुस्ती मान्य केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादींना दुरुस्त दाव्याच्या अनुशंगाने आपला अतिरिक्त लेखी जबाब देण्याची पुरेपूर संधी आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करता येईल या निष्कर्षापर्यंत मी पोहोचले आहे. म्हणून मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आ दे श :**

१. वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने दाव्यात नियोजित दुरुस्ती १४ दिवसाच्या आत करावी.

SARIKA SANDEEP PAKHALE

Digitally signed by SARIKA SANDEEP PAKHALE
Date: 2023.09.05 15:45:01 +0530

( श्रीमती एस.एस.पाखले )

दिनांक : ३०/०८/२०२३ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपुर

## CERTIFICATE

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Vallal L. M. |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Pandharpur |
| Date | | 30/08/2023 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 30/08/2023 |
| Order uploaded on | : | 04/09/2023 |